# प्रेस नोट दि.१४/०३/२०१९
# येरवडा पोलीस स्टेशन

**जागतिक महिला दिनाचे औचित्र्य साधून ब्रिटीश कौन्सिल या संस्थेने आयोजित केलेल्या कार्यक्रमास उपस्थित राहून महिला पोलीस अधिकारी यांनी महिला व बालकांचे सुरक्षा विषयक मार्गदर्शन केले बाबत.**

---

बिटीश कौन्सिल ही संस्था विविध देशात शिक्षण विषयक काम करते तसेच मुलांना परदेशात उच्च शिक्षण मिळवून देण्यासाठी काम करते. सदर संस्थेचे पुण्यातील कार्यालय रामसुख हाऊस, ३०१, तिसरा मजला, गणेशखिंड रोड, शिवाजीनगर, पुणे येथे आहे.

सदर संस्थेच्या महिला सिनियर मॅनेजर श्रीमती कजरी मित्रा यांनी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून, दि.०९/०३/२०१९ रोजी सायं.१७:३० वा. ते १९:०० या वेळेत येथे सर्व क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांकरीता कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सदर कार्यक्रमासाठी त्यांनी येरवडा पोलीस स्टेशन कडील महिला अन्वेषण पथकाच्या महिला पो.उप.निरी. स्वप्ना वाघमारे यांना आमंत्रित केले होते.

महिला पो.उप.निरी.स्वप्ना वाघमारे यांनी म.पो.ना. सुषमा राजे यांचेसह सदर कार्यक्रमास उपस्थित राहून पोलीस दलाचे कामकाज, महिला पोलीस अधिकारी म्हणून काम करीत असताना येणारे अनुभव तसेच महिला व बालकांचे सुरक्षेच्या दृष्टीने प्रचलित असलेले कायदे तसेच महिला व मुलांचे सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस दलाकडून राबविण्यात येणारे बडीकॉप, भरोसा सेल, पोलीस काका, दामिनी पथक अशा विविध उपक्रमांची माहिती देऊन उपस्थित महिलांना निर्भयपणे चांगले काम करणेसाठी प्रोत्साहन दिले. सदर संस्थेच्या वतीने महिला पो.उप.निरी. स्वप्ना वाघमारे यांचा सत्कार करण्यात येऊन गौरविण्यात आले.

अशा रितीने येरवडा पो.स्टे.कडील महिला पो.उप.निरी.स्वप्ना वाघमारे यांनी वरील संस्थेचे कार्यक्रमास उपस्थित राहून महिला व बालकांचे सुरक्षा विषयक अस्तित्वात असलेले कायदे व पोलीस दलाकडून राबविण्यात येणारे विविध उपक्रमांची माहिती देऊन चांगली कामगिरी केली आहे.

( **राजेंद्र कदम** )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे


BRITISH
COUNCIL